वर्ष १२ वे ✻ अंक ३६ वा ✻ गुरुवार, दिनांक ०६ फेब्रुवारी २०२५ ते बुधवार, दिनांक १२ फेब्रुवारी २०२५ ✻ रायगड ✻ महाराष्ट्र ✻ मुल्य २ रुपये ✻ पृष्ठे४

अन्यायाला वाचा फोडणारे.... ज्वलंत एकमेव वृत्तपत्र.... रायगडसह मुंबई,नवी मुंबई मधून प्रकाशित...! शब्दांना लेखणीची धार..!
रायगड लोकधारा
संपादक: विजय चंद्रकांत गायकर RNI No. MAHMAR/2013/48622
बातम्या आणि जाहिरातीसाठी
संपर्क साधा :- ८३६९३९४३७२
सा.रायगड लोकधारा वृत्तपत्र /
रायगड लोकधारा न्यूज चॅनल

अन्यायाला वाचा फोडणारे....
ज्वलंत एकमेव वृत्तपत्र....
रायगडसह मुंबई,नवी मुंबई मधून प्रकाशित...!
शब्दांना लेखणीची धार..!

# रायगड लोकधारा

RNI No. MAHMAR/2013/48622
संपादक: विजय चंद्रकांत गायकर

## संमेलनाला प्रितम म्हात्रेंची उपस्थिती



**सा.रायगड लोकधारा वृत्त/ पनवेल प्रतिनिधी :** को.ए.सो.च्या इंदुबाई वाजेकर इंग्रजी माध्यमाच्या शाळेचे वार्षिक संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या संमेलनाला शेतकरी कामगार पक्षाचे नेते तथा पनवेल पालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी भेट देत सर्वांना शुभेच्छा दिल्या. यावेळी विद्यार्थ्यांनी कलात्मक आणि सांस्कृतिक कार्यक्रमात विविध राज्यातील वेशभूषा परिधान करून विविधतेतून एकतेचा संदेश दिला. तसेच, विद्यार्थ्यांनी विज्ञान प्रदर्शनाच्या माध्यमातून बौद्धिक कलेचे सादरीकरण उत्कृष्ट रित्या मांडले. दरम्यान, विद्यार्थ्यांनी जीवनावश्यक वस्तूंचे छोटे स्टॉल्स उभारून छोट्याशा व्यापाराचे एक उत्तम नियोजन करून दाखवले. या संमेलनाचे नियोजन मुख्याध्यापिका आणि शिक्षक वृंद यांनी केले होते. यावेळी प्रीतम म्हात्रे यांच्यासह वी.सी. म्हात्रे, मानसी कोकीळ, वैशाली गावित, मनीषा पाटील, शिक्षिका, विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते. ✻✻✻✻✻✻✻✻

# कळंबोलीत रंगणार कुस्त्यांचा आखाडा

**रुस्तम ए हिंद पै. सिकंदर शेख विरुद्ध रुस्तम ए हिंद लाली गुरुदास पोल यांचाआकर्षक सामना विजेत्याला पाच लाख रुपये व मानाची गदा विविध गटात होणार सामने**



**सा.रायगड लोकधारा वृत्त/पनवेल प्रतिनिधी :** उदयोन्मुख खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी भारतीय जनता युवा मोर्चा पनवेलतर्फे पनवेल विधानसभा मतदार संघात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली दिनांक ०६ ते ०९ फेब्रुवारी पर्यंत भव्य क्रीडा महोत्सव अर्थात नमो चषक २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. त्या अंतर्गत रविवार दिनांक ०९ फेब्रुवारी रोजी कळंबोली मधील सेक्टर १६ येथे भव्य कुस्ती स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेत रुस्तम ए हिंद पै. सिकंदर शेख (सोलापूर) विरुद्ध रुस्तम ए हिंद लाली गुरुदास पोल (पंजाब) यांचा खास आकर्षण सामना होणार असून यामधील विजेत्या पैलवानास पाच लाख रुपये व मानाची गदा, तर महिलांच्या गटात महाराष्ट्र चॅम्पियन पै. अमेधा घरत (पनवेल) विरुद्ध महाराष्ट्र चॅम्पियन पै. अंकिता फातले (कोल्हापूर) यांचा खास आकर्षण सामना होणार असून विजेत्या पैलवानाला ५१ हजार रुपये व मानाची गदा देऊन गौरविण्यात येणार आहे. तसेच पुरुषांच्या गटात महाराष्ट्र चॅम्पियन पै. निखिल कदम विरुद्ध महाराष्ट्र चॅम्पियन पै. अनिल कचरे, पै. शुभम वळखडे विरुद्ध पै. आकाश दुबे, पै. श्रेयश कचरे विरुद्ध पै. सुशांत देवमाने, पै. साजन पावशे विरुद्ध पै. निलेश कदम, आणि पै. समाधान घनपट विरुद्ध विजय घुले यांच्या सामना रंगणार आहे. महिला गटात पै. स्नेहा येवले विरुद्ध वैष्णवी यादव आणि पै. रितिका कारंडे विरुद्ध गौरी जाधव यांचा विशेष सामना होणार आहे. कुस्ती स्पर्धेतील महिला ३५, ४० व ४५ किलो वजनाखालील गटातील प्रत्येकी विजेतीला १ हजार रुपये तर उपविजेतीस ५०० रुपये, ५० किलो खालील गटातील विजेतीला १५०० रुपये व तर उपविजेतीस १ हजार रुपये, ५५ किलो वजनाखालील गटातील विजेतीला पान २ वर...

## खासगी मालकीच्या जागेतून रस्ता बनविण्यास कडाडून विरोध

# करंजा ग्रामस्थ उतरले रस्त्यावर



**सा.रायगड लोकधारा वृत्त/ उरण वार्ताहर :** करंजा-रेवस, रोरो सेवेसाठी करंजा येथील खासगी जागेतून रस्ता करण्यास करंजा ग्रामस्थांनी सोमवारी (दि. ३) कडाडून विरोध करीत रस्त्यावर उतरण्याचा इशारा दिला आहे.करंजा-रेवस तसेच मोरा भाऊचा धक्का अशी रोरो सेवा करण्याचा घाट शासनाने सुरू केला आहे. परंतु, त्यापूर्वी शासनाने कोट्यवधी रुपये खर्च करून मच्छिमार बाधवांसाठी करंजा बंदराची उभारणी करून तो सुरू केला आहे. या बंदरासाठी पूर्वनियोजित रस्ता न बनविता जुन्या रस्त्यावरूनच अवजड वाहनांची वाहतूक केली जात आहे. यामुळे करंजा ते उरण चारफाटा रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुर्दशा गेली सात ते आठ महिन्यांपासून झाली आहे. तो दुरुस्त करण्यासाठी आजतागायत कोट्यवधी रुपये खर्च करून ठेकेदार व सार्वजनिक बांधकाम विभाग अधिकारी यांच्या आर्थिक साटेलोटामुळे निकृष्ट काम करून शासनाचा निधी वाया गेला आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीपासूनच सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी आता आहेत. याकडे दुर्लक्ष करून रोरो सेवा व करंजा रेवस पुलासाठी रस्ता पान २ वर...

# २१ सुवर्ण,१६ रौप्य पदकांसह पेण प्रथम



**सा.रायगड लोकधारा वृत्त/ खरोशी वार्ताहर :** नुकत्याच पनवेल वाकडी येथे रायगड जिल्हा युनिफाईट असोशिएशनने सेन्ट अँडरुस इंटरनॅशनल स्कूल वाकडी येथे रायगड जिल्हा युनिफाईट फेडरेशन कपचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत पेण येथील रविंद्र म्हात्रे, आदित्य तेरेदेसाई, विनायक पाटील, प्रथमेश मोकल यांच्याकडे प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थांनी २१ सुवर्ण पदके,१६ रौप्य पदके आणि ३ कांस्य पदके पटकावली. त्यांच्या घवघवीत यशामुळे पेण तालुका प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला. या स्पर्धेची विजयाची ट्रॉफी महाराष्ट्र युनिफाईटचे अध्यक्ष मंदार पनवेलकर यांच्या हस्ते देण्यात आली. यावेळी आयोजक निलेश भोसले, रायगड युनिफाईट असोशिएशनच्या सचिव स्मिता पनवेलकर, युनायटेडचे प्रसार प्रचार प्रमुख व प्रशिक्षक प्रतिक कारंडे उपस्थित होते. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी रायगड जिल्हा युनिफाईटचे रेफरी पॅनल व सहकारी यांनी काम पाहिले. या स्पर्धेत पनवेल महापलिका खांदा कॉलनी दुसऱ्या क्रमांकाचा मानकरी तर पनवेल ग्रामीण हा तिसऱ्या क्रमांकाचा मानकरी ठरला व उत्कृष्ट टीम म्हणून सूकापुरच्या टीमला सन्मानित करण्यात आले. ✻✻✻✻

# पक्ष सदस्य नोंदणी अभियान; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आमदार प्रशांत ठाकूर यांचा सन्मान



**सा.रायगड लोकधारा वृत्त/ पनवेल प्रतिनिधी :** मुंबई येथे संपन्न झालेल्या भाजप संघटन पर्व प्रदेश प्रशिक्षण कार्यशाळेत महाराष्ट्रातील सर्वाधिक सदस्य नोंदणी करणाऱ्या विधानसभा मतदारसंघातील लोकप्रतिनिधींचा सन्मान करण्यात आला. त्यानुसार पनवेल विधानसभेला देण्यात आलेले उद्दिष्ट पूर्ण केल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आमदार प्रशांत ठाकूर यांचा सत्कार करण्यात आला. मागील महिन्यात शिर्डीमध्ये भाजप प्रदेशचा मेळावा संपन्न झाला. त्यामध्ये केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट जाहीर केले होते. त्यानुसार पनवेल विधानसभा संघासाठी १ लाख १४८०० सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट देण्यात आले होते. पनवेल विधानसभा मतदार संघात आमदार प्रशांत ठाकूर व जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या नेतृत्वाखाली हे उद्दिष्ट पार करत १ लाख ३० हजार सदस्य नोंदणी झाली आहे. त्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण, राष्ट्रीय सह संघटन मंत्री शिवप्रकाश शर्मा, मंत्री पंकजा मुंडे, माजी विधान परिषद विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर, यांच्यासह राज्यातील आमदार, पदाधिकारी, जिल्हाध्यक्ष उपस्थित होते. पनवेल विधानसभा मतदार संघात सदस्यता नोंदणी पान २ वर...

## जिल्ह्यात जलजीवनवर पंधराशे कोटी खर्च; तरीही जलदुर्भिक्ष्य कायम

# 'हर घर नल, जल कधी येणार भाऊ?




**सा.रायगड लोकधारा वृत्त/**

**अलिबाग प्रतिनिधी :** रायगड जिल्ह्यात 'हर घर नल' पोहचल्याचा जिल्हा परिषदेचा दावा आहे; मात्र या नळामध्ये पाणी कधी येणार? याची प्रतिक्षा रायगडकरांना लागून राहिली आहे. जिल्ह्यात जवळपास पंधराशे कोटी रुपये खर्चून १ हजार ४९६ जलजीवनच्या योजनांची कामे गतवर्षी हाती घेण्यात आली; मात्र अजूनही पाणीटंचाईचे सावट कायम आहे. यंदा २७६ गावे आणि ७४० वाड्यांना पाणीटंचाई भासेल, असा अंदाज वर्तवत जिल्हा परिषदेने पाच कोटी ६२ लाख रुपयांचा आराखडा तयार केला आहे.जलजीवन योजनेची कामे सुरुवातीपासूनच वादाच्या भोवऱ्यात सापडली आहेत. कधी अधिकाऱ्यांशी, राजकीय नेत्यांशी हातमिळवणी करून एकाच कंत्राटदाराने मिळविलेल्या १०० कोटींहून अधिक रकमेची कामे, तर कधी जीएसटी घोटाळा, तर कधी एकाच कंत्राटदाराने कमिशन घेऊन दुसऱ्या कंत्राटदाराला विकलेल्या कामांमुळे जलजीवनची कामे नेहमीच चर्चेत राहिली. यात निकृष्ट दर्जाची कामे हा सर्वात कळीचा मुद्दा राहिला. या सर्व योजना डिसेंबर २०२४ पर्यंत पूर्ण करणे अपेक्षित होते; मात्र यातच लाडकी बहीण योजनेने सरकारी तिजोरी रिकामी केल्याने जलजीवनच्या १ हजार ४२२ पैकी ७३१ योजनांचे काम पूर्ण होऊनही यातील ४७१ योजनांची देयके देण्यासाठी जिल्हा परिषदेकडे पैसेच शिल्लक राहिले नाहीत. या योजना ग्रामपंचायतींकडे पान ३ वर...

### टंचाई निवारण कामे

| कामाचे स्वरूप | संख्या | अपेक्षित खर्च |
|---|---|---|
| विहिरी खोदणे, गाळ काढणे | ७३ | ६०.१८ लाख |
| विंधन विहीरी दुरूस्ती | ११० | ४५.९० लाख |
| विंधन विहिरी खोदणे | १०७ | १०३.६८ लाख |

### ठेकेदारांची बोंबाबोंब

लोकसभा निवडणूक होण्यापूर्वी ज्या कंत्राटदारांचे राजकीय वर्चस्व होते, त्यांना बिले काढता आली. बाकीच्यांना अद्याप रक्कम मिळालेली नाही. जिल्हा परिषदेच्या कार्यालयात फेऱ्या घालूनही पैसे खात्यात जमा होत नसल्याने कंत्राटदार संताप व्यक्त करीत आहेत.

> ज्या योजना हस्तांतरित झाल्या नाहीत, त्या सुरू ठेवण्यासाठी कंत्राटदारांनाच वीजबिल, डागडुजी, देखभाल करणाऱ्या कामगाराचा खर्च द्यावा लागतो. कंत्राटदार देयके मंजूर करण्यासाठी तगादा लावत आहेत; परंतु पैसेच नसल्याने त्यांना पैसे देता येत नाहीत. सध्या १२५ कोटी रुपयांची मागणी करण्यात आली आहे.
>
> – संजय वेंगुर्लेकर, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

पान १ वरून

## कळंबोलीत रंगणार कुस्त्यांचा आखाडा

२ हजार रुपये तर उपविजेतीस १५०० रुपये आणि ५७ ते ७६ किलो वजनाखालील गटातील विजेतीस १० हजार रुपये व नमो केसरी मानाची गदा तर द्वितीय क्रमांकाला ५ हजार रुपये तर तृतीय क्रमांकाला ३ हजार रुपये, १७ वर्षाखालील मुले गटातील ३०, ३५, ४० व ४५ किलो वजनाखालील गटातील प्रथम क्रमांकास प्रत्येकी १ हजार रुपये तर द्वितीय क्रमांकाला ५०० रुपये, ५० व ५५ किलो खालील गटातील प्रथम क्रमांकाला प्रत्येकी १५०० रुपये द्वितीय क्रमांकास प्रत्येकी १ हजार रुपये, ६०, ६५ आणि ७० किलो वजनाखालील गटातील प्रथम क्रमांकास अनुक्रमे २ हजार रुपये, ३ हजार रुपये आणि ५ हजार रुपये, द्वितीय क्रमांकास अनुक्रमे १५००, २ हजार आणि ३ हजार रुपये, वरिष्ठ मुले ५० ते ६० किलो वजनाखालील गटातील प्रथम क्रमांकाला ३ हजार रुपये, द्वितीय क्रमांकास २ हजार रुपये, ६० ते ७० किलो वजनाखालील गटातील प्रथम क्रमांकाला ५ हजार रुपये, द्वितीय क्रमांकास ३ हजार रुपये, ७० ते ७९ किलो वजनाखालील गटातील प्रथम क्रमांकाला ५ हजार रुपये, द्वितीय क्रमांकास ३ हजार रुपये, तसेच ७९ ते १२५ किलो वजनाखालील गटातील प्रथम क्रमांकाला १० हजार रुपये व नमो केसरी मानाची गदा, द्वितीय क्रमांकास ५ हजार रुपये, तर तृतीय क्रमांकाला ३ हजार रुपये असे कुस्ती स्पर्धेत एकूण ८ लाख ५१ हजार रुपयांच्या बक्षिसांचे स्वरूप आहे. मानाच्या अशा या कुस्ती दंगलीचा कुस्तीप्रेमींनी लाभ घ्यावा, असे आवाहन स्पर्धेचे संयोजक कळंबोली भाजपा व पनवेल महानगरपालिकेचे माजी स्थायी समिती सभापती अमर पाटील यांनी केले आहे.


## करंजा ग्रामस्थ उतरले रस्त्यावर

बनविण्यासाठी दडपशाही सुरू केली आहे. दिवंगत माजी जिल्हा परिषद अध्यक्ष रमेश डाऊर यांच्या कुटुंबियांनी आपल्या मालकी हक्काची जागा गावाच्या हितासाठी व द्रोणागिरी मंदिरासाठी येण्या-जाण्यासाठी विनामोबदला दिली होती. त्यांची कोणतीही परवानगी न घेता परस्पर रस्ता बनविण्यासाठी प्रयत्न सुरू केले होते.आज संबंधित अधिकाऱ्यांनी घटनास्थळी येऊन पाहणी करीत असताना ग्रामस्थांनी व सामाजिक कार्यकर्ते सचिन डाऊर, सरपंच अजय म्हात्रे यांनी हरकत घेत कडाडून विरोध केला. ज्या ठिकाणी शासकीय जागेत अतिक्रमण करण्यात आली आहेत, त्यांच्यावर कारवाई न करता ते वाचविण्याचा प्रयत्न अधिकारी करीत असल्याचा आरोप यावेळी ग्रामस्थांनी केला. खासगी जागेतून सदरचा रस्ता बनवू नये तसेच जुन्या रस्त्यावरून मासळी घेऊन जाणाऱ्या अवजड वाहानांमुळे जीव मुठीत धरून ग्रामस्थांना प्रवास करावा लागत आहे, त्यात रो रो सेवा व करंजा रेवस पूल झाल्यानंतर तर आम्हां ग्रामस्थांची अवस्था ना घरका ना घाटका होईल अशी भीती व्यक्त करीत या रस्त्याला विरोध करीत असून, वेळप्रसंगी रस्त्यावर उतरून आंदोलन करू, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.यावेळी मेरिटाइम बोर्ड मुंबईच कार्यकारी अभियंता राजू झपाटे, अभियंता शिंदे, तहसीलदार उरण डॉ. उद्धव कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ, सरपंच अजय म्हात्रे, सचिन डाऊर व ग्रामस्थ उपस्थित होते. **येणाऱ्या प्रकल्पाला आमचा विरोध नाही. आमच्या डाऊर कुटुंबियांनी सुप्रसिद्ध द्रोणागिरी मंदिरात येणाऱ्या भाविकांसाठी व येथील ग्रामस्थांसाठी आमच्या मालकी हक्काची जागा कोणताही मोबदला न घेता दिली आहे. त्या जागेचा वापर इतर प्रकल्पासाठी होणार असेल तर त्यास विरोध केला जाईल. त्यासाठी कायदेशीर लढाई लढण्यास तयार आहोत.– सचिन डाऊर, सामाजिक कार्यकर्ता**

## पक्ष सदस्य नोंदणी अभियान; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आमदार प्रशांत ठाकूर यांचा सन्मान

अभियानासाठी पुढाकार घेणाऱ्या सर्वांचे हे यश असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी म्हटले असून त्यांनी सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

## नेरळ येथे स्विमिंग पूलमध्ये बुडून चार वर्षीय बालकाचा मृत्यू



**सा.रायगड लोकधारा वृत्त/कर्जत प्रतिनिधी :** नेरळ पूर्व परिसरात बदलापूर येथून आलेल्या एका चार वर्षीय मुलाचा स्विंिग पुलमध्ये पडून मृत्यू झाला. आयांश अभिजित निवाळकर असे मृत बालकाचे नाव असून तो आपल्या आईसोबत फिरण्यासाठी नेरळ येथे आला होता. सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास आयांश हा आपल्या आईचे लक्ष चुकवून स्विंिग पुलाजवळ गेला असता पाण्यात बुडून त्याचा मृत्यू झाला.बदलापूर (पश्चिम) शनिमंदिर परिसरातील मनोहर निवास इमारतीत राहणारे निवाळकर हे चार वर्षीय आयांश मुलगा आणि आई असे फिरण्यासाठी मैत्रिणींसोबत सकाळी नेरळ येथे आले होते. निवाळकर आणि त्यांच्या मैत्रिणी नेरळजवळील कोल्हारे ग्रामपंचायत हद्दीतील आशीर्वाद व्हीला या फार्महाऊसवरील बंगल्यात मुक्कामाला राहिले होते. त्यांच्यासोबत त्यांची लहान मुलेदेखील होती. पाच महिला आणि एक पुरुष त्याचसोबत पाच लहान मुले असा हा ग्रुप होता. दुपारचे जेवण करून ह्या महिला बंगल्याच्या टेरेसवर गप्पागोष्टी करण्यासाठी बसले असताना लहान मुले बाजूला खेळत होती. यावेळी निवाळकर यांचा चार वर्षीय मुलगा आयांश आईची नजर चुकवत बंगल्यामध्ये असणाऱ्या स्विंिग पूलजवळ गेला असता तो पाण्यात पडला. ही घटना सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास घडली होती. सुमारे १५ मिनिटे हा मुलगा पाण्यात पडून होता. आपला मुलगा कुठे दिसून येत नसल्याने निवाळकर ह्या मुलाला शोधत होत्या. दरम्यान मुलगा स्विंिग पुलच्या पाण्यात पडल्याचे दिसून आल्याने त्याच्या आईच्या पायाखालची जमिनच सरकली. आयांशला नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्रातील उपस्थित डॉक्टरांनी त्याचा पाण्यात गुदमरून मृत्यू झाल्याचे यावेळी सांगितले.

## रिलायन्स गॅस पाईपलाईनने शेती झाली नापीक; जमिनीचे सर्वेक्षण करण्याचे सरकारचे आदेश

# कर्जतच्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळणार?

**सा.रायगड लोकधारा वृत्त/ कर्जत प्रतिनिधी :** कर्जत तालुक्यात २००७ पासून टाकण्यात येत असलेल्या रिलायन्स गॅस पाईपलाईनमुळे शेतकऱ्यांच्या जमिनी नापीक झाल्या आहेत. या सर्व जमिनीचे स्थळपाहणी सर्वेक्षण करण्याचे आदेश राज्य सरकारने दिले आहेत. कर्जत तालुक्यातून गुजरात राज्यातील दहेज ते महाराष्ट्र रायगड येथील नागोठणे अशी गॅस पाईपलाईन टाकण्यात आली आहे. कर्जत तालुक्यातील अनेक गावांतून ही पाईपलाईन टाकण्यात आली होती. मात्र गॅस पाईपलाईन टाकण्यात आल्यानंतर ती जमीन आहे तशी करण्याचे काम रिलायन्स गॅस पाईपलाईन कंपनीने केले नाही. त्यामुळे पावसाळ्यात त्या ठिकाणी जमिनीमध्ये कोणतेही पीक शेतकऱ्यांना घेता आले नाही आणि त्याचा मोबदला शेतकऱ्यांना अद्याप मिळालेला नाही. तालुक्यातील ३१



गावांतील शेतकऱ्यांनी रिलायन्स गॅस पाईपलाईन कंपनी विरुद्ध शासनाकडे दाद मागितली होती.दरम्यान, प्रकल्पग्रस्तांना तक्रारीची पडताळणी करण्यासाठी अधिकारी आणि कंपनी प्रतिनीधी यांची कमिटी तयार करण्यात येत असून सर्व्हेक्षण करण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. त्यामुळे कर्जत तालुक्यातील शेतकरी रिलायन्स गॅस पाईपलाईनमुळे खराब झालेल्या जमिनीच्या मालकांना शेतकऱ्यांना लवकरच मोबदला मिळेल, अशी शक्यता निर्माण झाली आहे.

# शाळा, कॉलेजचे नामफलक मराठी भाषेत लावा

## शिवसेना संपर्कप्रमुख राहुल गायकवाड यांची मागणी



**सा.रायगड लोकधारा वृत्त/**

**खोपोली प्रतिनिधी :** मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा केंद्र सरकारने गेल्या वर्षी दिलेला आहे. मराठी भाषेचा मान व सन्मान राखण्यासाठी २७ फेब्रुवारी हा मराठी भाषा दिवस म्हणुन संपुर्ण जगात साजरा केला जातो. त्यामुळे शाळांचे मराठीत नामफलक करा, अशा मागणीचे निवेदन खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या सर्व इंग्रजी शाळा आणि इतर संस्थांना शिवसेना शिंदे गट खोपोली शहर संपर्कप्रमुख राहुल गायकवाड यांनी दिले आहे.महाराष्ट्र शासनाने केलेल्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ १७ मार्च २०२४ अन्वये मराठी दुकाने व आस्थापने अधिनियम २०२२ प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. त्यानुसार आपल्या संस्थेतील सर्व शाळांचे नामफलक मराठी देवनागरी लिपीमध्ये असावा अन्यथाया कायदयाची अंमलबजावणी न केल्यास कलम २९ प्रमाणे १ लाख दंड येऊ शकतो व नंतर अशी पाटी लावण्यास जितका उशिर लागेल त्या प्रत्येक दिवसाला दोन हजार दंड आहे. त्यामुळे २७ फेब्रुवारीपर्यंत आपल्या शाळेचे व महाविद्यालयांचे नामफलक मराठी भाषेत लावा, अशा मागणीचे निवेदन खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या सर्व इंग्रजी शाळा, कारमेल स्कूल, सेंट जोसेफ इतर इंग्रजी माध्यमांच्या शाळा तसेच यावर अमंलबजावणी करण्यासाठी जिल्हा शिक्षण अधिकारी, गटशिक्षण अधिकारी यांनाही निवेदन शिवसेना शिंदे गट खोपोली शहर संपर्क प्रमुख राहुल गायकवाड यांनी दिले आहे.

# द्रोणागिरी नोड परिसरात पाणीटंचाई

**सा.रायगड लोकधारा वृत्त/**

**उरण वार्ताहर :** मुंबईचे नवे उपनगर बनलेल्या उरणच्या द्रोणागिरी नोड मधील रहिवाशांना कमी दाबाने पाणी पुरवठा केला जात आहे. त्यामुळे येथील रहिवासी त्रस्त असून या इमारतींना टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याची वेळ सिडकोच्या पाणी पुरवठा विभागावर आली आहे. त्यामुळे रहिवाशांमध्ये नैराश्याची भावना व्यक्त होत आहे.मुंबई शहराची वाढती लोकसंख्या, वाढती महागाई यामुळे मुंबई शहरात राहणे सर्वसामान्य माणसाला पडवत नाही. त्यात मुंबई शहराच्या हाकेच्या अंतरावर असलेला उरण तालुका हा अटल सेतू आणि उरण नेरुळ लोकल रेल्वेमुळे काही अंतरावर येऊन ठेपला आहे. त्यामुळे नागरिकांनी उरणला सर्वाधिक पसंती दर्शविली असल्याने सिडकोच्या माध्यमातून द्रोणागिरी नोड परिसर झपाट्याने विकसित होत आहे. या परिसरात उंच इमारती उभ्या राहत असल्याने या इमारतीमधील रहिवाशांसाठी पाणी पुरवठा करण्यासाठी सिडकोकडून जलवाहिनी टाकण्यात आली आहे. मात्र, या जलवाहिनीतून कमी दाबाने पाणीपुरवठा केला जात आहे. एकंदरीतच इमारतीमधिल रहिवाशांना पुरेसा पाणी पुरवठा होत नाही. त्यामुळे रहिवाशांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. सध्या द्रोणागिरी नोड परिसरातील रहिवाशांना सिडकोच्या हेटवणे धरणातून नवीमुंबई शहराकडे जाणाऱ्या चिरनेर गावातील जलवाहिनीतून टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे.




# चरई बौद्धवाडी स्वप्नातील गाव पुरस्काराने सन्मानित




**सा.रायगड लोकधारा वृत्त/ पोलादपूर प्रतिनिधी :** स्वदेस फाउंडेशन ही संस्था महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण भागातील गावांमध्ये स्वच्छता, सुंदर, स्वास्थ्य, समृद्ध आणि साक्षर या पाच तत्वांवर काम करत असून स्वदेश फॉउंडेशनच्या नाविन्यपूर्ण योजनांमुळे अनेक गावांचा कायापालट झाला आहे. स्वदेस फाउंडेशनच्या ७० टक्के पेक्षा अधिक गुणवत्ता प्राप्त करणाऱ्या गावांना फाउंडेशन तर्फे 'स्वप्नातील गाव' हा पुरस्कार दिला जातो. पोलादपूर तालुक्यातील चरई ग्रामपंचायत हद्दीतील बौद्धवाडीला सोमवार दिनांक ३ जानेवारी रोजी स्वप्नातील गाव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाला स्वदेस फॉउंडेशनचे व्यवस्थापक दिपेश जाधव,प्रशिक्षण विभागाचे मनोज चव्हाण, यांसह गावातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खालापूरात कचरा धुमसतोय;श्वास कोंडतोय!

## कचऱ्याचे ढिग पेटवून देण्याचे प्रकार। प्रशासनाचे दुर्लक्ष, नागरिकांचे आरोग्य धोक्यात



**सा.रायगड लोकधारा वृत्त/**

**खालापूर प्रतिनिधी :** खोपोली शहर व खालापूर तालुक्यात प्लास्टिकने भरलेले कचऱ्याचे ढीग जेथे दिसतील तेथे पेटवून देणे, जेथे खड्डा असेल तेथे गाडून टाकणे, कार्यालय परिसरात बाद झालेली कागदपत्रे पालापाचोळा टाकून पेटवून टाकणे, असे प्रकार चोहोबाजूंनी राजरोज सुरू आहेत. कचऱ्याच्या विल्हेवाटीची ही प्रक्रिया तालुक्यातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आणणारी आहे. पाली फाटा परिसरानंतर आता हाळ ग्रामपंचायत हद्दीत राष्ट्रीय महामार्गालगतदेखील रविवारीच्या सुट्टीच्या दिवशी भर उन्हात प्लास्टिकच्या पिशव्यांनी भरलेला कचऱ्याचा ढीग पेटविण्यात आला होता. घनकचरा व्यवस्थापन अधिनियमानुसार कोणताही कचरा, पालापाचोळा जाळण्यासाठी बंदी घातलेली आहे. तरीही बिनधास्तपणे तालुक्यात अनेक ग्रामपंचायत हद्दीत सुट्टीच्या दिवशी दिवसा व रात्रीच्या सुमारास कचरा पेटविला जात असल्याचे चित्र दिसून येत आहे. प्रदूषण विभागासह कर्जत प्रांताधिकारी, खालापूर तहसीलदार, खालापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, ग्रामविस्तार अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे खालापूरकरांचे आरोग्य धोक्यात आल्याचे ग्रामस्थांमधून बोलले जात आहे.खालापूर पंचायत समितीपासून एक ते दोन किलोमीटर अंतरावर महामार्ग रस्त्यांवर, नदीला लागून कचरा पेटविला जात असताना कोणतीच कारवाई होत नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. हवा प्रदूषित होते म्हणून पर्यावरण कायद्यानुसार कचरा जाळणे हा गुन्हा आहे. घनकचरा व्यवस्थापन अधिनियमानुसार कोणताही कचरा, पालापाचोळा जाळण्यासाठी बंदी घातलेली आहे. कचरा जाळल्याने अनेक पान ४ वर...

## रायगड लोकधारा

पान २ वरून

### 'हर घर नल, जल कधी येणार भाऊ?

हस्तांतरित करण्यास संबंधित कंत्राटदार तयार नाहीत. अशा परिस्थितीत रायगडमधील पाणीटंचाई कमी होण्यात फारसा फरक पडलेला नाही. दरवर्षीप्रमाणे यंदाही तब्बल पाच कोटी ६२ लाख रुपयांचा आराखडा राज्य सरकारने मंजूर केला असून यातून १ हजार १६ गावे आणि वाडयांना तात्पुरत्या स्वरूपात पाणीपुरवठा केला जाणार आहे.एका एका कंत्राटदाराला ५० कोटींहून अधिक कामांचे वाटप करण्यात आले होते. तर काहींना १ क्षमतेपेक्षा जास्त कामे दिली होती. ही सर्व कामे २०२४ पर्यंत पूर्ण करण्याची अटही करारनाम्यामध्ये घालण्यात आली होती. कामे वाटपाच्या प्राथमिक टप्प्यातच ही योजना वादाच्या भोवऱ्यात अडकली होती.

**डेडलाईन :**

हुकलीजिल्ह्यातील १ हजार ४९६ जलजीवन योजनांसाठी केंद्र सरकारकडून खर्च केले जाणार आहेत. हर घर नल से जलची घोषणा करीत प्रसिद्धीही देण्यात आली होती. २०२४ च्या अखेरपर्यंत योजना पूर्ण होण्याची डेडलाइन देण्यात आली होती. त्यामुळे २०२४ नंतर जिल्ह्यात पाणीटंचाई राहणारच नाही, असे सत्तेतील लोकप्रतिनिधी सांगत होते. प्रत्येकाच्या घरात नळाद्वारे पाणी येणार म्हणून जिल्ह्यातील टंचाईग्रस्त नागरिक खूश होते; मात्र योजनेच्या अंमलबजावणीतील अनेक दोषांमुळे योजना पूर्ण होऊ न शकल्याने महिलांना पिण्याच्या पाण्यासाठी यंदाही पायपीट करावीच लागणार आहे.

# पोलादपूरात दुग्ध व्यवसायाबाबत मार्गदर्शन शिबीर उत्साहात

**सा.रायगड लोकधारा वृत्त/पोलादपूर प्रतिनिधी :** तालुका फार्मर प्रोड्युसर कंपनी आणि वाशिष्ठी मिल्क अँड मिल्क प्रॉडक्ट प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने पार्लेवाडी येथे रविवारी सायंकाळी दुग्ध व्यवसायाबाबत मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात प्रमुख मार्गदर्शक म्हणून वाशिष्ठ डेअरीचे चेअरमन प्रशांत यादव उपस्थित होते.यावेळी बारामती ग्रो कंपनीचे डॉ. अमोल महाजन, व्यवस्थापक राहुल नलावडे, महाड बाजार समितीचे उपासभापती वैभव चांदे, मार्गदर्शक राजेंद्र मालुसरे, पोलादपूर पंचायत समितीचे प्रभाग समन्वयक सुनील नरवडे, वाकणचे सरपंच शांताराम जंगम आदी उपस्थित होते. वाशिष्ठी डेअरीचे व्यवस्थापक प्रदीप मगदूम यांनीही मार्गदर्शन केले. दूध उत्पादक शेतकरी आर्थिकदृष्ट्या समृद्ध व्हावा हा



वाशिष्ठी डेअरीचा उद्देश आहे. प्रशांत यादव यांच्या मार्गदर्शनाखाली डेअरीची वाटचाल सुरू आहे, असेही ते म्हणाले. वाशिष्ठी डेअरीचा पारदर्शक कारभार, शेतकऱ्यांना दर दहा दिवसांनी शेताकऱ्यांच्या खात्यात जमा होणारे पैसे यामुळे वाशिष्ठी डेअरीवरील विश्वास वाढत आहे. महिलांनीही या व्यवसायात मोठ्या संख्येने यावे, असे आवाहनही यावेळी मगदूम यांनी केले.

# कर्जत : उल्हास नदीला जलपर्णीचा विळखा

## दूषित पाण्यामुळे अंगाला येते खाज; आजाराची भीती पाणी परिक्षणासाठी पाठविणार



**सा.रायगड लोकधारा वृत्त/**

**कर्जत प्रतिनिधी :** आंध्रा धरणाचे पाणी कर्जत तालुक्यातून वाहताना उल्हास नदीमधून ठाणे जिल्ह्यात जाते. धरणाचे पाणी पेज नदीमधून आणि नंतर उल्हास नदीमधून वाहत जाते.त्यामुळे कर्जत शहराच्या मधून वाहणाऱ्या उल्हास नदीमध्ये सांडपाणी वाहत जाते आणि त्यामुळे ही नदी प्रदूषित होते. त्याचा फटका जानेवारी महिन्यापासून बसण्यास सुरुवात होते आणि आता उल्हास नदीचे पाणी हिरवेगार बनले आहे. जलपर्णीमुळे पाण्यावर हिरवा तवंग दिसून येत आहे. त्यामुळे पाणी दूषित झाले असून, अंगाला खाज येत आहे. या प्रदूषित पाण्यामुळे आजार बळावण्याची भीती व्यक्त केली जात आहे.कर्जत येथून खऱ्या अर्थाने उल्हास नदीला सध्या जलपर्णीचा विळखा बसला आहे. तेथे मोठ्या प्रमाणात जलपर्णी उल्हास नदीत जमा झाली आहे. मागील अनेकदा या जलपर्णी काढण्याचे काम कर्जत परिसरात हाती घेण्यात आले आहे. परंतु काढलेली जलपर्णी ही नदी पात्रातून काढून बाहेर न टाकता नदीपात्रातच टाकली जात असल्याने ही जलपर्णी नेरळ, शेलू, वांगणी परिसरात पाण्याच्या प्रवाहात वाहून जाऊन नदी पत्रातील पाणी दूषित झाले आहे. कर्जत शहरात नागरी वस्तीतली सांडपाणी वाहून नेणारी गटारे ही उल्हास नदीमध्ये सोडली आहेत. पाणी प्रदूषित असले की त्यामुळे जलपर्णी उगवतात, याचा प्रत्यय कर्जत -मुरबाड रस्त्यावर असलेल्या पुलावरून जाताना सर्वांना येत आहे. कारण गेल्या तीन महिन्यांपासून कर्जत शहराच्या सभोवताली उल्हास नदीमध्ये असलेले पाणी हिरवेगार बनले आहे. जलपर्णी जंगल हे सांडपाण्यामुळे तयार झाले आहे. कर्जत शहरातून काही प्रमाणात सांडपाणी हे पुढे नदीतून खाली वाहून जात असते. त्या पाण्यात दररोज जलपर्णी वाहून पुढे आंबिवली येथून बारमाही वाहत्या बनलेल्या उल्हास नदीतून तरंगत जाताना दिसत आहे. यापूर्वी या जलपर्णी मे महिन्यात उल्हास नदीच्या पाण्यातून वाहत जाताना अनेकदा दिसायच्या. मात्र मागील दोन वर्षांपासून जानेवारी महिन्यापासूनच जलपर्णी पाण्यात वाहत जाताना दिसत आहेत. त्यामुळे उल्हास नदीचे पाणी पिण्यासाठी वापरणाऱ्या अर्धा कर्जत तालुका आणि पुढे ठाणे जिल्ह्यातील कल्याणपर्यंत भागातील रहिवाशांचे आरोग्य धोक्यात आले आहे. हे सर्व हे पाणी पिण्यासाठी वापरत असल्यामुळे दूषित हिरवेगार पाणी पाहून, सर्वांच्या पोटात धस्स झाले आहे. कारण नदीचे पाणी केवळ गढूळ बनले नाही तर त्या पाण्याला चिकटपणादेखील आला आहे. दुसरीकडे वाहत्या नदीमध्ये पोहण्याची मजा घेणारे यांच्या शरीरावर खाज सुटण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे नदीमध्ये पोहायला जाणाऱ्यांची संख्या कमी झाली असल्याचे ग्रामस्थ सांगत आहेत. मात्र ही समस्या केवळ कर्जत शहरात सांडपाणी उल्हास नदीमध्ये सोडल्यामुळे निर्माण झालेली नाही. गेल्या काही वर्षात सातत्याने नागरीकरण झालेल्या नेरळ शहर वजा गावातून असलेल्या रहिवाशी भागातील सांडपाणीदेखील माथेरानच्या डोंगरातून पावसाळ्यात पाणी वाहून नेणाऱ्या नाल्यात सोडले आहे. तो नाला पुढे उल्हास नदीला जाऊन मिळतो. कर्जतनंतर उल्हास नदीमध्ये नदीचे पाणी प्रदूषित करणारे जलपर्णीचा उगम नेरळ गावातूनदेखील झाला आहे. ते सांडपाणी येथे उल्हास नदीमध्ये गेल्यानंतर जलपर्णी मोठ्या संख्येने वाढत होती. ही समस्या केवळ सांडपाण्यामुळे निर्माण झाली असल्याचे सगुणाबाग या कृषी पर्यटन केंद्राचे नदीचे पाणी मुंबई येथे परीक्षणासाठी पाठवण्याचा निर्णय घेतला आहे.

# छत्रपती संभाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा



**महाड :** स्वराज्याची राजधानी किल्ले रायगडावर धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा ३५१ वा राज्याभिषेक सोहळा मंगळवारी, ४ फेब्रुवारी रोजी पार पडला. या सोहळ्याला राज्याचे कॅबिनेट मंत्री भरत गोगावले उपस्थित होते. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा राज्याभिषेक ३५१ सोहळा स्वराज्याची राजधानी किल्ले रायगडावर मोठ्या धुमधडाक्यामध्ये संपन्न झाला. यावेळी छत्रपती संभाजी महाराज यांची पालखी होळीच्या माळावरून राजदरबारात आणण्यात आली. या ठिकाणी विधिवत पूजा करत छत्रपती संभाजी महाराज यांचा राज्याभिषेक करण्यात आला. या राज्याभिषेक सोहळ्याला मोठ्या संख्येने शिवभक्तदेखील उपस्थित होते.

# म्हसळा एसटी स्थानकासह बाजारपेठ बहरली

## चार महिन्यांच्या प्रतिक्षेनंतर बससेवा पूर्ववत

**सा.रायगड लोकधारा वृत्त/ म्हसळा प्रतिनिधी :** एसटी स्थानक ते नवानगर असा एक किलोमीटर अंतराच्या काँक्रिट रस्त्याचे नुतनीकरण करण्याचे काम मागील चार महिन्यांपासून सुरु होते. रस्ता अरुंद असल्याकारणाने बांधकामास अडथळा येऊ नये, म्हणून मागील चार महिन्यांपासून म्हसळा शहरातून एसटी वाहतूक सेवा पूर्णतः बंद होती. याचा व्यावसायिक परिणाम म्हसळा शहर बाजारपेठ आणि छोट्या-मोठ्या दुकानदारांवर झाला होता,



त्यातच वेळ आणि पैशाचा अपव्यय होत होता. एसटी वाहतूक बंद असल्याने चार महिने बाजारपेठ दिसत होती. आता ही एसटी सेवा पूर्ववत झाल्याने, म्हसळा बाजारपेठ बहरली आहे. मागील चार महिने प्रवाशांच्या सेवेसाठी वाहतूक नियंत्रक कक्ष तात्पुरता न्यू इंग्लिश स्कूलशेजारी सकलप हद्दीत स्थलांतर करण्यात आला होता. अनेक दिवसांच्या प्रतिक्षेनंतर ४ जानेवारी रोजी म्हसळा एस.टी. स्थानकातून नियमितपणे वाहतूक सेवा सुरु केल्याने व्यापारी असोसिएशन आणि प्रवासी वर्गाचा आनंद द्विगुणित झाला आहे. येथील रस्ता बांधकाम विकास करण्यासाठी खासदर सुनिल तटकरे आणि मंत्री अदिती तटकरे यांच्या विकास निधीतून तब्बल २ कोटी ७५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दोन मार्गिका व सांडपाणी व्यवस्थापनाकरिता पक्के गटार बांधकाम पूर्ण झाले आहे.बांधकाम करण्यास अडसर ठरु नये म्हणून श्रीवर्धन बांधकाम विभागाने एसटी आगारामार्फत प्रवासी वर्गाला येण्या-जाण्यासाठी स्थानक व्यवस्था सकलप खारगाव खुर्द आणि बायपासजवळ करण्यात आली होती; परंतु येथे कसलीच व्यवस्था नव्हती. त्यामुळे सातत्याने नाराजी व्यक्त होत होती. अशातच येथे येण्याजाण्यासाठी प्रवाशांना म्हसळा शहरातून ५० रुपये रिक्षा भाडे मोजावे लागत होते. दुसऱ्या बाजूने तितक्याच अंतरावरील बायपास रस्ता (पेट्रोलपंप) येथून येजा करावे लागत असे. आता एसटी वाहतूक सेवा म्हसळा शहरातून सरळ मार्गे सुरु झाली असल्याने प्रवासीवर्गाने समाधान व्यक्त करताना खासदार सुनील तटकरे, मंत्री अदिती तटकरे आणि श्रीवर्धन आगार व्यवस्थापक यांना धन्यवाद देऊन आभार मानले आहेत.



www.raigadlokdharanews.in
नियमित वाचा साप्ताहिक :
रायगड लोकधारा

पान ३ वरून

## खालापूरात कचरा धुमसतोय;श्वास कोंडतोय!

विषारी वायू, धूर वातावरणात पसरत असते. यापासून कर्करोग, यकृताचे आजार, मलावरोध, अस्थमा, श्वसनावरोध, मेंदूविकार होण्याची दाट शक्यता आहे, अशी माहिती तज्ज्ञांकडून देण्यात आली आहे. फोम कप्स, अंड्याचे ट्रे जाळल्याने निघणारा स्टायरिन वायू त्वचा आणि फुफ्फुसांवर वाईट परिणाम करणारा ठरत असतो. कचरा जाळल्यानंतर निघणाऱ्या धुरामुळे संवेदनशील श्वसन यंत्रणेवर विशेषतः लहान मुलांच्या श्वसनावर विपरीत परिणाम होत असतो. त्वचा काळवंडणे, डोकेदुखी, चक्कर येणे, मळमळणे याचा त्रास होत असतो. डॉक्झिनमुळे गर्भवती महिला, मुले आणि वृद्धांचे आरोग्य खालावू शकते. शक्यतो कोणताही कचरा असेल तर तो जाळला जावू नये याची काळजी प्रत्येक जबाबदार नागरिकांनी घ्यायला हवी, असे आवाहन शासनाकडून केले जाते. मात्र खालापूरात भरदिवसा कचरा मोठ्या प्रमाणावर जाळला जात असताना, स्थानिक प्रशासनाकडून दुर्लक्ष केले जात असल्याने ग्रामस्थांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.प्लास्टिकचा कचरा असेल तर तो स्थानिक प्रशासनाकडे घंटागाड्यामध्ये द्यावा व इतर पालापाचोळा असलेला कचरा असेल तर तो एकगठ्ठा करून ठेवावा. कालांतराने त्याचे आपोआप खत निर्माण होते. असे पाठ नागरिकांना शिकवले जाते, पण चार-चार दिवस घंटागाडी गावात न फिरणे, आपल्याच कार्यालय परिसरात कागदपत्रे पालापाचोळा टाकून पेटविणे, या अशा प्रकारांमुळे नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक, विजय चंद्रकांत गायकर यांनी रोशन प्रिंटर्स, शॉप नं.०४ / ०५, प्रकाश निवास, प्लॉट नं.१३४/ ०१, आगरी समाज हॉल जवळ, पनवेल, रायगड महाराष्ट्र – ४१० २०६ येथे छापून मु. पो. पोयंजे, ता. पनवेल , जि. रायगड, महाराष्ट्र – ४१० २०६ येथून प्रकाशित केले. लेखांतून व्यक्त होणाऱ्या मतांशी संपादक सहमत असतीलचं असे नाही. सर्व वाद पनवेल न्याय कक्षेत. ( ८३६९३९४३७२ / ९१३६५३९५६० ) / Facebook :- vijay gaikar / Whatsapp No. ९१३६५३९५६० /
संपादक : विजय चंद्रकांत गायकर Email Id :- Gaikarvijay26@gmail.com RNI No. MAHMAR/2013/48622